## राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**
**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.१३८५/२०२२/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| डॉ. वैशाली पंकज वीर<br>रा. मु. पो. आगासखिंड, ता. सिन्नर, जि. नाशिक, नाशिक ४२२५०२. | शिक्षण उपनिरीक्षक, शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक, विभागीय आयुक्त कार्यालय आवार, नाशिक रोड, ता. जि. नाशिक. | शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय, नाशिक नाशिक विभाग, नाशिक, विभागीय आयुक्त कार्यालय आवार, नाशिक रोड, ता. जि. नाशिक. |

**सुनावणी दिनांक –१४/०१/२०२५**

**१. उपस्थिती –**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | उपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |

**२. द्वितीय अपील अर्ज –**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : ०९/०३/२०२२

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : जन माहिती अधिकारी यांनी अपेक्षित माहिती दिली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेतलेली नाही.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : कोणतीही विनंती केलेली नाही.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : १६/११/२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १७/११/२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन २०१३ ते सन २०२० अखेर

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती** : सुर्या शिक्षण प्रसारक व समाजसेवा मंडळ संचलित , १) व्हि.टी. आहेर माध्यमिक विद्यालय कळवण, इ. ८ वी ते १० वी. २) जनता विद्यालय देवगांव बेंद्रीपाडा, कळवण इ. ८ वी ते १० वी. ३) माध्यमिक विद्यालय कळवण, इ. ५ वी ते ७ वी व इ. ८ वी ते १० वी. या तिनही शाळेचे वेळोवेळी गेलेले १) शाळा मुल्यांकनास पात्र ठरेपर्यंत प्रस्तूत कार्यालयामार्फत वरीष्ठ कार्यालयास सादर केलेले सर्व मुल्यांकन तक्ते यांच्या प्रमाणित प्रती २) त्या प्रस्तावासोबत जोडलेली कागदपत्रे यांच्या प्रती (छायांकित) , शासनाकडून शासन निर्णय दि.१५ नोव्हेंबर २०११ व दि.१६ जुलै २०१३ अन्वये वेळोवेळी अघोषित शाळांची माहिती मागविण्यात आलेली होती. त्यानुसार प्रस्तुत संस्थेच्या उपरोक्त नमूद तीन शाळा व १ तुकडीचा प्रस्ताव जेवढया वेळा वरिष्ठ कार्यालयास सादर केला त्या सर्व माहिती उपलब्ध व्हावी.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही** : सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपनिरीक्षक, शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक, यांनी कोणतीही कार्यवाही केली असल्याचे दिसून येते नाही.

**४. प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २७/१२/२०२१

(२) प्रथम अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २७/१२/२०२१

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती उपलब्ध करुन दिली नाही.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय, नाशिक नाशिक विभाग, नाशिक, यांनी कोणतीही कार्यवाही केली असल्याचे दिसून येत नाही.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा –**

- **जन माहिती अधिकारी –** सन २०१३ ते सन २०२० अखेर अशी विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागीतली आहे.

**६. निष्कर्ष –**

(१) अपिलार्थी यांनी माहिती अर्जात माहितीशी संबंधीत कालावधी सन २०१३ ते सन २०२० अखेर असा नमुद केला असून सन २०१३ च्या कोणत्या दिनांकापासून व सन २०२० च्या कोणत्या दिनांकापर्यंत माहिती हवी आहे याचा स्पष्ट उल्लेख केलेला नसल्यामुळे माहितीचा अर्ज मोघम स्वरुपाचा ठरतो

(२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपनिरीक्षक, शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक, यांनी अपीलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही केली असल्याचे दिसून येत नाही

(३) तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय, नाशिक नाशिक विभाग, नाशिक, यांनी अपीलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने सुनावणी घेऊन आदेश पारित केलेले दिसून येत नाहीत.

(४) अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही सुमारे ८ वर्षांची ३ शाळांची संबंधित असून विस्तृत व व्यापक स्वरुपाची असल्यामुळे मागणी केलेली माहिती ही विस्तृत व व्यापक स्वरुपाची असून माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७(९) नुसार अशी माहिती देणे अभिप्रेत नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

(१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपनिरीक्षक, शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक, यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा १५ दिवसांत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

(२) शिक्षण आयुक्त पुणे, यांना आदेशीत करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन, आदेश पारीत न करुन अधिनियमातील कलम १९(६) तसेच शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र. केंमाअर्ज-२००७/११८२/प्र.क्र.६५/०७/६ (मा.अ) दि.१२/१२/२००७ मधील तरतुदींचे उल्लंघन केलेले असल्याची खातरजमा झाल्यास त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक सा.प्र.वि.क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ दि.३१/०३/२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

(३) प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.१३८५/२०२२/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

प्रत - माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

शिक्षण आयुक्त, शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, डॉ. ॲनी बेझंट रोड, पुणे ४११००१

जावक क्र. ८८५२ 30 JUN 2025